नियमित दिवाणी मुकदमा क्र.८/२०१७ मधील नि.८६ वरील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करून सदर अर्जास हरकत घेतलेली आहे.

३. वादीच्या विद्वान विधिज्ञांनी यूक्तीवाद केला की अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती ही महत्वाची आहे व त्यामुळे दाव्याच्या मूळ स्परूपात कोणताही बदल होणार नाही. म्हणून वादीच्या विधिज्ञांनी सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. उलटपक्षी, प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञांनी यूक्तीवाद केला की, सदरचा अर्ज हा नामंजूर करावा कारण वादीने सदर दुरूस्ती मागणी ही उशिराने मागितलेली आहे.

५. खालील मुददे माझे विचारार्थ निर्माण झाले, ते कारणांसह त्याचा निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

०६. वादीचे अर्जामधील दुरूस्ती पाहता व ती जरी मंजूर केली तरी दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उल्लेखनीय बाब म्हणणे वादीने यापूर्वी दाव्यात दूरूस्ती केलेली दिसून येते परंतु त्यावेळी वादी सदर दुरूस्ती मागू शकला असता परंतु वादीने त्यावेळेस सदर दुरूस्तीची मागणी केली नाही.

०७. सदरचा दावा हा अद्यापपर्यंत पुराव्यासाठी लागलेला नाही. म्हणून दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ अन्वये सदर दुरूस्ती ही मंजूर होणेस पात्र आहे. परंतु वादीने या अगोदर सदर दुरूस्ती मागितलेली नाही त्यामुळे वादी हे प्रतिवादी यांना खर्च देणेस पात्र आहेत. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे मूळ दाव्यात दुरूस्ती ही पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रू.३०००/- प्रतिवादीला देवून करावी व दुरूस्ती दाव्याची प्रत त्वरित अभिलेखावर दाखल करावी व त्याची प्रत प्रतिवादीला सुध्दा पुरविण्यात यावी.

३. वादीने वरील आदेशाचे वरील मुदतीत पालन केले नाही तर ते पुढील कोणत्याही मागणीस पात्र राहणार नाही.

दि.३१.१.२०१९

(आर. आर. थोरात )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,दहिवडी.